University of Mumbai

Phone No.-022-2262 0172
email- aaunituniversityofmubai@gmail.com

Academic Authority Unit,
UNIVERSITY of MUMBAI,
Fort campus, P. Demelo Road,
Mumbai – 400 032

Ref. No.: AAU / ICD / 2015 – 16 / 737

Date : 19 / 01 / 2016

विषय : विधी पदवी अभ्यासक्रमासाठी सामायिक प्रवेश प्रक्रिया व सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत.
संदर्भ : शासन निर्णय क्र. सी.ई.टी.–२०१५ / प्र.क्र.३७९/मशि–२, दि. ०४/१२/२०१५.

## परिपत्रक :–

मुंबई विदयापीठातील विविध संस्थांचे प्रमुख, संस्थेचे संचालक, संलग्नित महाविदयालयांचे / मान्यताप्राप्त संस्थाचे प्राचार्य / संचालक तसेच विदयापीठ विभागांचे प्रमुख व सर्व उपकुलसचिव, सहा. कुलसचिव, प्रशासकीय विभागांचे प्रमुख यांना कळविण्यात येते की, उपरोक्त संदर्भिय शासननिर्णयाद्वारे उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय / अशासकीय अनुदानित / विना अनुदानित / कायम विना अनुदानित तीन वर्षीय व पाच वर्षीय विधी पदवी अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा यांच्यामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियांद्वारे एक खिडकी पध्दतीने प्रवेश देण्यात येणार आहेत. तरी याबाबत **सविस्तर माहितीसाठी महाराष्ट्र शासनाचा संबंधीत शासन निर्णय सोबत जोडला आहे.** या शासन निर्णयांतील सुचनांचे तंतोतंत पालन करावे, ही विनंती.

मुंबई – ४०० ०३२
१८ जानेवारी, २०१५

कुलसचिवांकरिता

सोबत : शासन निर्णय

प्रति,

मुंबई विदयापीठातील विविध संस्थांचे प्रमुख, संस्थेचे संचालक, संलग्नित महाविदयालयांचे / मान्यताप्राप्त संस्थाचे प्राचार्य / संचालक तसेच विदयापीठ विभागांचे प्रमुख, प्रशासकीय विभागांचे सचांलक आणि प्रमुख, वित्त व लेखाअधिकारी, सर्व उपकुलसचिव, संचालक–विद्यार्थी कल्याण विभाग, प्राध्यापक–संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, संचालक–बहि:शाल शिक्षणमंडळ, संचालक–आजिवन अध्ययन आणि विस्तार, मुद्रण व लेखन सामुग्री नियंत्रक, विद्यापीठ अभियंता, सर्व सहायक कुलसचिव, सुरक्षा अधिकारी, सहायक सुरक्षा अधिकारी (विद्यानगरी परिसर) आणि कुलसचिवांच्या कार्यालयातील विविध विभागांचे व कक्षांचे प्रमुख यांच्या माहिती व योग्यत्या कार्यवाहीसाठी.

****



Desktop / 2016 / Letters 2016 / January 2016

विधी पदवी अभ्यासक्रमासाठी सामायिक प्रवेश प्रक्रिया व सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत.

९८

**महाराष्ट्र शासन,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
शासन निर्णय क्रमांक-सीईटी-२०१५/प्र.क्र.३७९/मशि-२,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०४ डिसेंबर, २०१५.

**वाचा** :- (१) शासन अधिसूचना क्र.एमआयएससी.२०१५/सीआर नं.२५२/टिई-४, दिनांक १६.६.२०१५.

**प्रस्तावना** :- राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्थांमधील प्रवेशाचे नियमन करण्यासाठी व शुल्क निश्चित करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५ प्रसिध्द करण्यात आला आहे. तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील व्यावसायिक अभ्यासक्रम संदर्भाधीन शासन अधिसूचना दिनांक १६.६.२०१५ अन्वये घोषित करण्यात आले आहेत. सदर अभ्यासक्रमांमध्ये विधी पदवी अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे.

नमूद अधिनियमामध्ये खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशाच्या नियमनाची तरतूद करण्यात आली असल्याने खाजगी विनाअनुदानित अभ्यासक्रमांबरोबरच शासकीय व अनुदानित महाविद्यालयातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी एक खिडकी पध्दतीने एकच प्रवेश प्रक्रिया राबवून राज्यातील शासकीय/अशासकीय अनुदानित/विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयातील विधी पदवी अभ्यासक्रमांचे प्रवेश राज्यस्तरीय सामायिक प्रवेश प्रक्रियेद्वारे करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय**:- उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील राज्यातील शासकीय / अशासकीय अनुदानित /विना अनुदानित/कायम विनाअनुदानित विधी पदवी अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा यांच्या मार्फत केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेद्वारे एक खिडकी पध्दतीने प्रवेश देण्यात येतील. यासाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय सामायिक प्रवेश परीक्षेच्या गुणांच्या अनुक्रमानुसार केंद्रीभूत प्रवेश प्रक्रीयेसाठीची गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार विधी पदवी अभ्यासक्रमांना प्रवेश देण्यात येतील.यामध्ये खालील विधी अभ्यासक्रमांचा समावेश राहील:-

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | सामायिक प्रवेश परीक्षेचा स्तर | सक्षम प्राधिकारी |
|---|---|---|---|
| १ | पदवी अभ्यासक्रम<br>(अ) तीन वर्षीय विधी पदवी अभ्यासक्रम<br>(ब) पाच वर्षीय विधी पदवी अभ्यासक्रम | राज्य सामायिक प्रवेश परीक्षा | आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा |

**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**
Web : www.dhepune.gov.in, E-Mail :mavi.dhepune.gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फोन नं.०२०/२६१११५३

क्र.अमवि-२०१५/विधी/शासनपत्र १७१२०/मवि-२ /12829. दि.०९/१२/२०१५

**ई-मेलद्वारे**

PA to R

प्रति,

१.कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

२.सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य.

UNIVERSITY OF MUMBAI
IS/ICD/ECD/201 /-
11 JAN 2016
4634

**विषय- विधी पदवी अभ्यासक्रमासाठी सामायिक प्रवेश प्रक्रिया व सक्षम प्राधिकारी घोषित करण्याबाबत.**

**संदर्भ- शासन निर्णय क्र.सीईटी-२०१५/ प्र.क्र.३७९/मशि-२, दि.४/१२/१५**

उपरोक्त विषयांकित शासन निर्णय पहावा. सदर शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित विधी पदवी अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०१६-१७ पासून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परिक्षा यांच्यामार्फत केंद्रिभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे एक खिडकी पध्दतीने प्रवेश देण्यात येणार आहेत.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तरी त्यानुसार आपल्या अखत्यारितील शासकीय/अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित विधी महाविद्यालयांना आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावे. तीन वर्षीय व पांच वर्षीय

D.R.(A.A.)
12/1/16

**(डॉ.व्ही.आर. मोरे)**
शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

प्रत- मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२ यांना संदर्भाधीन शासन निर्णयासंदर्भात माहितीस्तव सविनय सादर.

Law college information-all region.docx